दौंडमध्ये पुन्हा एकदा महायुतीच्या उमेदवारालाच पसंदी स्थानिक कार्यकर्त्यांची आमदार राहुल कुल यांना साथ

दौंड : दौंड विधानसभा मतदारसंघातील नेत्यांची पुन्हा एकदा भाजपला पसंदी असल्याचे दिसून येत आहे. कारण राहुलदादा कुल यांनी २०१९ मध्ये भाजपमध्ये प्रवेश करत आमदार झाले. २०१९ पासून दौंड मतदारसंघात विकास कामाला भाजपमुळे गती मिळाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे दौंड मतदारसंघातील जनाई-शिरसाई योजना, बीबीसी कालवा अस्तरीकरण यासारख्या योजना पुन्हा एकदा सुरू करून दौंड तालुक्याचा दुष्काळी शिक्का पुसण्यासाठी कार्यकर्त्यांची राहुलदादा कुल यांनाच पसंदी असल्याचे दिसून येत आहे.

दौंड विधानसभेच्या मतदानासाठी अवघे काही दिवस उरले असतांना दौंडमध्ये महायुतीचे उमेदवार राहुलदादा कुल यांच्याकडे कार्यकर्त्यांचा मोठा ओढा असल्याचे दिसून येत आहे. यासोबतच त्यांनी जातीय आणि राजकीय समीकरणे जुळवून घेतल्याने त्यांचा विजय पक्का असल्याची खात्री कार्यकर्त्यांना दिसून येत आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे दौंडमध्ये ओबीसी मतदार हा निर्णायक असून ज्या बाजूला हे मतदार वळतात त्या बाजूचा विजय निश्चित मानला जातो. त्यामुळे दोन्हीकडून त्यांना आपल्याकडे वळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न चालू होते. परंतु दौंडचे विद्यमान आमदार राहुलदादा कुल हे आघाडीवर असल्याचे पाहायला मिळाले. राहुलदादा यांनी ओबीसी बहुजन पार्टीचे ओबीसी नेते महेश भागवत यांचा पाठिंबा मिळवण्यात यश मिळवले आहे. दौंड तालुक्यात महेश भागवत यांना माळी समाज्याचा मोठा पाठिंबा असून या समाजातून त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे. तसेच महेश भागवत यांनी लोकसभा निवडणुक लढवली असून या निमित्ताने त्यांचे कार्यकर्ते वाढले आहेत. तसेच धनगर समाजाचे नेते आनंद थोरात यांचाही पाठिंबा मिळवण्यात यश आले आहे. कारण दौंडमध्ये धनगर समाजाचे मतदान हे जास्त प्रमाणात असून या समाजावर आनंद थोरात यांचा चांगला प्रभाव आहे. यांचा तालुक्याच्या राजकारणात सक्रिय सहभागा असतो. तसेच आनंद थोरात दौंड तालुक्यातील ओबीसी नेते असून माजी आमदार काकासाहेब थोरात यांचे पुत्र आहेत. यांचा तालुक्याच्या राजकारणात सक्रिय सहभाग असतो. मागील २०१९ च्या निवडणुकीमध्ये आनंद थोरात व महेश भागवत यांनी राहूल कुल यांच्या विजयात महत्वपूर्ण भूमिका बजावली होती. तसेच मागील काही दिवसात दौंड शहरातील अनेक दलित संघटनांनी पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे मागील प्रमाणे काही जातीय गणिते राहुल कुल यांनी जुळवून विविध घटकांचा पाठिंबा मिळत असल्याने त्यांची ताकद दुपटीने वाढली असून, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत राहुलदादा कुल सर्वाधिक मतांनी विजयी होतील असा विश्वास कार्यकर्ते व्यक्त करतांना दिसून येत आहे.

मतदारसंघातील प्रश्न केवळ राहुलदादाच लावू शकतात मार्गी !

राहुलदादा कुल २०१९ मध्ये भाजपसोबत गेल्यामुळे आणि अडीच वर्षांपूर्वी महायुतीची सत्ता आल्यामुळे दौंड मतदारसंघातील बहुतांश कामी मार्गी लागली आहेत. मात्र उर्वरित विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी राहुलदादा यांना पुन्हा एकदा विधानसभेवर पाठवण्याची मागणी कार्यकर्ते करतांना दिसून येत आहे. २०१९-२०२४ या पंचवार्षिकमध्ये राजेगाव परिसरात गावाला जोडणारे मुख्य रस्ते, पाणीपुरवठा योजना, अंतर्गत रस्ते, बंधिस्त गटर अशा प्रकारची कोट्यावधी रुपयांची विविध विकासकामे मार्गी लावली आहेत. यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये केला आहे.

थोडक्यात

भारताच्या माजी राष्ट्रपतीनी बजावला मतदानाचा हक्क

पुणे : कोथरूड विधानसभा मतदारसंघात भारताच्या माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांनी वयाच्या ८९ व्या वर्षी मतदानाचा हक्क बजावला; भारत निवडणूक आयोगाच्यावतीने गृह मतदानाची सुविधा उपलब्ध करुन दिल्याबद्दल त्यांनी आभार मानले.

कोथरूड विधानसभा मतदारसंघामध्ये १५ व १६ नोव्हेंबर रोजी नमुना १२ ड भरुन दिलेल्या ८५ वर्षापेक्षा अधिक वय असलेले जेष्ठ नागरिक तसेच दिव्यांग मतदारांचे गृहभेटीद्वारे मतदान नोंदवून घेण्यात येत आहे. त्यापैकी आज ८५ वर्षापेक्षा अधिक वय असलेले ९१ जेष्ठ नागरिक तसेच ४ दिव्यांग मतदार असे एकूण ९५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

या प्रक्रियेकरिता विधानसभा मतदारसंघात एकूण आठ पथकांची स्थापना करण्यात आली आहे, पथकाच्यावतीने भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करत मतदारांच्या घरी जाऊन मतदानाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येत आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सुनील गाढे यांनी दिली आहे.

विधानसभेचे तीन उमेदवार गुन्हा दाखल करण्याचे आदेश

जुन्नर : जुन्नर विधानसभा मतदारसंघ खर्च निरीक्षक डॉक्टर ए वेंकडेश बाबू आय आर एस यांच्या प्रमुख उपस्थित निवडणूक निर्णय अधिकारी पल्लवी घाटके यांच्या अध्यक्षतेखाली एकूण ११ उमेदवार पैकी आठ उमेदवारांची दुसरी खर्च तपासणी पार पडली .

सहाय्यक खर्च निरीक्षक संदीप ओव्हळ व सहाय्यक खर्च निरीक्षक सुरेंद्र वाघमारे उपस्थित होते. यावेळी आठ उमेदवार व त्यांचे खर्च प्रतिनिधी उपस्थित खर्च ताळमेळ प्रक्रिये दरम्यान उमेदवारांच्या खर्चात तफावत आढळून आली नाही.

विधानसभेचे तीन उमेदवार अनुपस्थित होते व त्यांनी खर्च सादर केला नसल्यामुळे खर्च निरीक्षक डॉ. ए वेंकडेश बाबू आय आर एस यांच्या सूचनेनुसार नोटीस बजाविण्यात आली , तसेच त्यांच्याविरोधात आरपी ॲट १९५१ च्या कलम ७७ नुसार निवडणूक करतात दैनंदिन हिशोब ठेवण्यास तीन उमेदवार असमर्थ ठरलेले आहेत .

दापोडीत आल्याने तरुणावर धारदार शस्त्राने वार

दापोडी / प्रतिनिधी

येऊ नकोस असे सांगूनही तू दापोडीत का आला, असे म्हणत एका तरुणावर धारदार शस्त्राने वार करण्यात आले.

येऊ नकोस असे सांगूनही तू दापोडीत का आला, असे म्हणत एका तरुणावर धारदार शस्त्राने वार करण्यात आले.

आनंद वसंत कांबळे (वय ३१, रा. अविनाश अपार्टमेंट, संगम नगर, जुनी सांगवी) असे जखमी झालेल्या तरणाचे नाव असून त्यांनी गुरुवारी याबाबत दापोडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी मोसीन बाबु सय्यद (वय ३०, रा. जयभीम नगर, पाटील गिरणी जवळ, दापोडी) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी कांबळे व त्यांचा मित्र सनी मुदलीयार हे दोघेजण आई गार्डनकडून सांगवीकडे पायी जात असताना आरोपी मोसीन हा तिथे आला. तो कांबळे यांना म्हणाला की, तुला काय सांगितले होते की, दापोडीत यायचे नाही. तरी तू का आलास, असे म्हणत शिवीगाळ केली. आपण मित्राला भेटायला आल्याचे फिर्यादी कांबळे यांनी सांगितले.

दापोंडी सर्वांची आहे असे बोलल्यावर आरोपीस राग आला. त्याने शिवीगाळ करत कांबळे याच्या कानाखाली मारली. तसेच धारदार हत्याराने फिर्यादी यांच्या मानेवर दोनवेळा वार करण्याचा प्रयत्न केला. मात्र सावध असलेल्या फिर्यादी यांनी तो वार हुकविला. मात्र धारदार हत्यार फिर्यादी यांच्या मनगटावर लागुन गंभीर दुखापत झाली.आरडाओरडा एकून नागरिक जमा होऊ लागले. त्यावेळी आरोपी मोसीन याने नागरिकांनाही धमकावले. त्यावेळी कोणीतरी पोलीस आल्याचे म्हटल्याने आरोपीने तेथेच कुठेतरी गवतात त्याचे धारदार हत्यार टाकून पळून गेला.

अलंकापुरीत काकडा आरती हरिनाम गजरात सांगता !

आळंदी : येथील पुणे आळंदी रस्त्यावरील श्री काशी विश्वेश्वर महाराज मंदिरात १९७३ पासून सुरु झालेली काकडा आरतीची परंपरा गेल्या ५१ वर्षांपासून अखंड काकडा आरती सुरु आहे. यात उत्तरोत्तर वाढ झाली असून आता युवक तरुण देखील यात सहभागी झाले आहेत. नागरिक भाविकांची पहाटे पासून काकडा आरतीला गर्दी वाढत आहे. माऊली मंदिरासह श्री ग्रामदैवत भैरवनाथ मंदिर तसेच विविध मठ, मंदिरे, धर्मशाळा परिसरात विविध गावांमध्ये ही काकडा आरतीची परंपरा जतन केली जात आहे. या काकडा आरतीची सांगता त्रिपुरारी पौर्णिमा दिनी पुष्प सजावटीसह धार्मिक परंपरांचे पालन करण्यात आले. आळंदीतील काळेवाडी येथील श्री काशी विश्वेश्वर विठ्ठल मंदिरात कोजागिरी पौर्णिमा ते त्रिपुरारी पौर्णिमे पर्यंत काकड आरती चे आयोजन करण्यात आले होते. श्री काशी विश्वेश्वर मंदिरात पहाटे पाच ते सात या वेळेत धार्मिक कार्यक्रम कार्तिक स्नान, काकड आरतीची सुमधुर अभंग ,भजन ,गवळणी, गायन असे कार्यक्रम झाले आहेत. त्रिपुरारी पौर्णिमेला काकडा आरती समाप्ती शुक्रवारी (दि. १५) काल्याचे किर्तन ह. भ. प. नंदकुमार बंदीष्टे महाराज यांचे कीर्तनाने सांगता झाली. काळेवाडी येथे काशी विश्वेश्वर मंदिरात कार्तिक स्नान निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम झाले. ज्ञानाई भजनी मंडळ, काळेवाडी यांचे भजन, वाघजाई भजनी मंडळ यांचे संगीत भजन, शुक्रवारी पहाटे काकडा आरती व महापूजा, महाप्रसाद वाटप उत्साहात झाले. कार्यक्रमाचे संयोजन बंडू उर्फ नाना काळे, समस्त काळेवाडी ग्रामस्थ यांचे वतीने करण्यात आले होते. काल्याचे किर्तन झाल्यानंतर सर्व भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. विश्वस्त प्रकाश काळे, बाबूराव काळे, शाबाजी काळे गुरुजी, सुरेश झोंबाडे, रामदास निकस, हनुमंत तापकीर, किरण काळे, गणेश पवार, स्वप्निल काळे, शंकर वाजे, धनाजी काळे, अशोक तापकीर आदींनी विशेष परिश्रम घेतले.

श्री काशी विश्वेश्वर महाराज मंदिरात काकडा आरतीचा उपक्रम ५१ वर्षांपासून सुरु असल्याचे बंडूनाना काळे यांनी सांगितले. यात विविध धार्मिक कार्यक्रम होत आहेत. काळेवाडी मधिल नागरिकांच्या माध्यमातून हा उपक्रम अखंड सुरु आहे. यात दैनंदिन काकड आरती, भजन व महापूजा आदींचा समावेश आहे. या वर्षीची सांगता काकडा आरती महापूजा, ग्राम दिंडी प्रदक्षिणा, काल्याचे हरिकीर्तन आणि महाप्रसाद वाटपाने होणार आहे. आळंदी काळेवाडी ग्रामस्थांच्या वतीने या काकडा आरतीचे परंपरेने आयोजन करण्यात आले आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून १ हजाराहून अधिक गुन्हे दाखल : राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक

पुणे / प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्यावतीने १ ऑक्टोबर २०२४ पासून १ हजार २६७ गुन्हे नोंदविण्यात आले असून १ हजार १७९ जणांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत ९८२ वाहनासह ५ कोटी ५५ लाख ६२ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाचे अधीक्षक चरणसिंह राजपूत यांनी दिली आहे.

जिल्ह्यात सराईत गुन्हेगारांविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ९३ अन्वये ५९ प्रस्ताव संबंधित दंडाधिकाऱ्यांकडे दाखल करण्यात आले आहेत. सदर इसमांकडून चांगल्या वर्तणुकीचे बंधपत्र घेण्यात येत असून आतापर्यंत १२ प्रकरणात रक्कम ११ कोटी ८० हजार रुपये इतक्या रक्कमेचे बंधपत्रे घेण्यात आलेली आहेत. या काळात गोवा राज्य निर्मित मद्याचे तीन गुन्हे उघडकीस आले असून या गुन्ह्यांमध्ये ४१ लाख ७७ हजार ३०५ रुपये किंमतीचा मुद्देमाल २ वाहनांसह जप्त करण्यात आलेला आहे.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, पुणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे, राज्य उत्पादन शुल्कचे अंमलबजावणी व दक्षता सह आयुक्त प्रसाद सुर्वे यांच्या मार्गदर्शन व सूचनेनुसार १ ऑक्टोबर २०२४ पासून विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर विविध पथके तयार करण्यात आली आहेत. या पथकांकडून जिल्ह्यातील सर्व हातभट्टी निर्मिती, वाहतूक, विक्री, तसेच ढाबे, अवैध ताडी धंदे यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे.

जिल्ह्यात कार्यक्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या अनुज्ञप्तीचे वारंवार सखोल तपासणी करुन अनुज्ञप्तीच्या ठिकाणी नियमबाह्य बाबी आढळल्यास संबंधिताविरुद्ध नियमातील तरतुदीनुसार कठोर कारवाई करण्यासाठी विशेष निरीक्षण मोहिम राबविण्यात येत आहे. अनुज्ञप्तीद्वारे शासनाने दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन होईल याकरीता २४ बाय ७ गस्ती घालण्यात येत आहे. तसेच भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे उल्लंघन करणाऱ्या एकुण १०९ अनुज्ञप्ती विरुध्द विभागीय विसंगती नोंदविण्यात आले असुन जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येत आहे. जिल्ह्यात अवैध मद्य वाहतुकीस आळा घालण्याच्या दृष्टीने एकूण १८ तात्पुरते चेकनाके उभारुन संशयित वाहनांची तपासणी करण्यात येत आहे. मतदारांना प्रलोभन दाखविण्यासाठी अवैध मद्याची वाहतूक होणार नाही, मद्य विक्रीच्या अनुज्ञप्त्या विहित वेळेत चालू व बंद होतील तसेच अल्पवयीन ग्राहकांना मद्यविक्री होणार नाही याबाबत दक्षता घेण्यात येत आहे. तसेच मद्य विक्रीच्या अनुज्ञप्तीचे नियमित निरीक्षण करण्यात येत आहे.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने मतदारांना प्रलोभन दाखविण्यासाठी अवैध मद्याची वाहतुक केली जाणार तसेच कुठल्याही अनुज्ञप्तीमधून विहीत वेळेच्या अगोदर व नंतर मद्य विक्री होणार नाही व वाईन शॉप व देशी दारुच्या दुकानांमधून घाऊक विक्री होणार नाही याकरिता डॉ. सुहास दिवसे, मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांनी त्यांसबंधित कडक कारवाई करण्याचे निर्देश राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत.

जिल्ह्यात १८ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजल्यापसून ते २० नोव्हेंबर २०२४ मतदानप्रक्रिया पार पडेपर्यंत आणि २३ नोव्हेंबर २०२४ मतमोजणीच्या दिवशी सर्व विधानसभा मतदार संघाचे अधिकृत निकाल घोषित होईपर्यंत कोरडा दिवस (ड्रायडे) घोषित करण्यात आलेला आहे. या काळात जिल्ह्यातील मद्य विक्रीच्या अनुज्ञप्ती बंद राहतील. अवैध मद्य निर्मिती, विक्री, वाहतूक किंवा मद्य वाटप आदी संबंधी माहिती, तक्रार द्यावयाची असल्यास टोल फ्री क्रमांक व राज्य उत्पादन शुल्क, पुणे विभाग अधीक्षक कार्यालयाच्या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक चरणसिंह राजपूत यांनी केले आहे.

खुन करुन त्यांनी गुन्हा पचवला होता पण...

पिंपरी : दारु पिऊन आई वडिलांना त्रास देतो, म्हणून तिने आपल्या मावस भावांना बोलावले. त्यांनी त्याचा पायाने गळा दाबुन खून केला. त्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी त्यांनी मृतदेह जाळून टाकला. दारुच्या नशेत थंडीत काकडून मेल्याचे त्यांनी गावकर्यांना सांगितले. त्याच्या मृतदेह जाळून टाकला. गावकर्यांनाही त्याचा त्रासच होत असल्याने कोणी काही बोलले नाही. त्यांनी गुन्हा जवळपास पचविलाच होता. परंतु, त्यांनी गुन्हा करताना आपल्याच हातातील मोबाईलवर शुटिंग करुन पुरावा तयार केला आणि पोलिसांच्या तावडीत सापडले. तळेगाव पोलिसांनी महिलेसह तिघांना अटक केली आहे.

सोमनाथ रघुनाथ काळे (वय ३६, रा. नानोली, ता. मावळ) असे खुन झालेल्याचे नाव आहे. मंगेश गोविंद दाभाडे (वय ३६), तनेष साईनाथ दाभाडे (वय १९, दोघे रा. कोटेश्वरवाडी, ता. मावळ) व महिला (वय ४०, रा. ब्राम्हणवाडी ता. मावळ) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याबाबत सहायक पोलीस निरीक्षक शाम मस्के यांनी तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. हा प्रकार मावळ तालुक्यातील नानोली गावात २६ ऑक्टोंबर रोजी घडला होता.

एल&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय: एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
CIN No.: L67120MH2008PLC181833
शाखा कार्यालय: पुणे

L&T Finance

गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे" आणि "जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 11.12.2024 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. श्रीकांत राजु गायकवाड 2. प्रियंका श्रीकांत गायकवाड	अशा मालमत्तेचे सर्व भाग आणि खंड जिचा पत्ता आहे : फ्लॅट क्र. सी1-1212, 12वा मजला, अधिमापन 23.20 चौ.मी., सोबत जोडलेली बाल्कनी जिचे अधिमापन 2.04 चौ.मी. आणि विस्तारित बाल्कनी जिचे अधिमापन 1.64 चौ.मी. प्रकल्पाचे नाव 'एक्सबिया आयफेल सिटी-फेज-1 आंबेठाण चौक, तळेगाव रोड, चाकण, महाराष्ट्र, 410501	H166222205 19034838 & H166222205 19034838L	27.08.2024	रु. 1,57,485/-	रु. 31,65,009.99/-	रु. 15,74,856/-	पूर्वनियोजित भेटीसह सर्व कामकाजांच्या दिवशी सकाळी 10.00 ते संध्याकाळी 5.30.	13.12.2024 रोजी दुपारी 12.00 ते दुपारी 2.00

सावजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/ वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **12/12/2024** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या **10%** परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी **25%** रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **13/12/2024** रोजी **18:00** पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **14/12/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या **75%** रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुर्दीनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेची तपासणी करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात जसे की **नाव - श्री शेखर काळे, संपर्क क्रमांक 9823271111, एल&टी फायनान्स लिमिटेड, 3रा मजला, कार्यालय क्रमांक 301 आणि 302, जेनिथ कॉम्प्लेक्स, के बी जोशी पथ, शिवाजी नगर, पुणे 411005 आणि श्री संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स लिमिटेड, ऑफिस: 6 वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट नंबर 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व - 0 मुंबई), 400 098.** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बोली/ऑफर स्वीकार/नाकारू/सुधारू/रद्द करू शकतो किंवा ई-लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुर्दीनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 16.11.2024
ठिकाण: पुणे

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

लोकमंथनच्या वृत्तानंतर ग्रामपंचायत प्रशासन खडबडून जागे

शिक्रापुरातील गटारलाईनच्या दुरुस्तीला अखेर सुरुवात

लोकमंथन इफेक्ट

रस्त्यावरील पाण्याने नागरिक व व्यावसायिक हैराण

शिक्रापूर / प्रतिनिधी

शिक्रापूर ता. शिरुर येथील चाकण चौकात रस्त्याचे कडेला गटार लाईन फुटून रस्त्यावर आलेल्या दुर्गंधीयुक्त पाण्याबाबत दैनिक लोकमंथन ने आवाज उठवताच ग्रामपंचायत प्रशासन खडबडून जागे होऊन अखेर गटारलाईनच्या दुरुस्तीला सुरुवात करण्यात आली आहे.

शिक्रापूर ता. शिरुर येथील चाकण चौक परिसरात कडेने ग्रामपंचायतची गटार लाईन आठवडा भरापासून फुटून गटारचे दुर्गंधीयुक्त पाणी रस्त्यावर साचून रस्त्यावर खड्डे पडून लहान मोठे अपघात घडू लागले तसेच रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे वाहतूक कोंडी होऊ लागली तर येथील व्यवसायिकांना व्यवसाय करणे जिकरीचे झाले, रस्त्यावर साचलेल्या दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे दुर्गंधी पसरुन नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असताना याबाबत दैनिक लोकमंथन ने दुर्गंधीयुक्त पाण्याने नागरिक, व्यावसायिक हैराण या मथळ्याखाली वृत्त प्रसिध्द केल्यानंतर ग्रामपंचायत प्रशासन खडबडून जागे होऊन अखेर गटारलाईनच्या दुरुस्तीला सुरुवात केली आहे तर दैनिक लोकमंथन चे स्थानिक नागरिक व व्यावसायिकांनी आभार मानले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. * व्यवस्थापकीय संपादक - रंजन साळवी. RNI : MAHMAR/2011/40983. Email - lokmanthan.pune@gmail.com